ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २०१ • शुक्रवार दि.८ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## दहावी निकालात पुन्हा मुलीच अव्वल

### राज्याचा निकाल ९२.०९ टक्के;सर्वाधिक कोकण तर सर्वात कमी संभाजीनगर,लातूर

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला. यंदा राज्याचा एकूण निकाल ९२.०९ टक्के लागला असून, पुन्हा एकदा मुलींनीच बाजी मारल्याचे स्पष्ट झाले आहे. मुलींचा निकाल ९४.९६ टक्के तर मुलांचा निकाल ८९.५६ टक्के लागला आहे.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत निकालाची घोषणा केली. यावेळी त्यांनी सांगितले की, यंदाचा निकाल गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे दोन टक्क्यांनी घसरला आहे. २०२५ मध्ये राज्याचा निकाल ९४.१० टक्के होता.यंदा निकाल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना दुपारी १ वाजेपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार नसून सकाळी ११.३० वाजल्यापासूनच संकेतस्थळावर निकाल उपलब्ध करून देण्यात आला. निकालाच्या दिवशी संकेतस्थळांवर वाढणारा ताण लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले.राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांतील विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. दहावी परीक्षेसाठी एकूण १५ लाख ५५ हजार ०२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४ लाख २० हजार ४८६ विद्यार्थी पान ४ वर

### विभागनिहाय निकाल टक्केवारी

कोकण-९७.६२%, मुंबई-९४.९७%, कोल्हापूर-९५.४७%, पुणे-९४.२४%, अमरावती-९०.५०%, नाशिक-९०.५३%, नागपूर-८९.०७%, लातूर-८८.४२%, छत्रपती संभाजीनगर-८८.४१%.

## पीपल्स हायस्कूलचा निकाल ८८ टक्के
## ‘नांएसो’कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचे घवघवीत यश

### कु.वैदेही कुलकर्णी ९७ टक्के,कु.प्राप्ती साखरे ९४ टक्के,सोहम वाघमारे ७८ टक्के

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटी द्वारा संचलित पीपल्स हायस्कूलचा यावर्षीचा दहावीचा निकाल ८८.३३ टक्के लागला आहे.



माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे यावर्षी घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत नांदेड एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित पीपल्स हायस्कूलचा निकाल ८८ टक्के लागला आहे. तर पीपल्स कॉलेज व सायन्स कॉलेज परिवारासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब म्हणजे कॉलेजमधील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी उत्कृष्ट यश संपादन करून संस्थेच्या नावलौकिकात भर घातली आहे. यामध्ये कु. वैदेही किरणकुमार कुलकर्णी हिने ९७ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

तसेच कु. प्राप्ती ज्ञानेश्वर साखरे हिने ९४ टक्के, वेदांत गंगाधर ताडोड याने ८४.६० टक्के, तर सोहम गंगाधर वाघमारे याने ७८ टक्के गुण मिळवले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच शिक्षकांचे नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ.प्रविण पाटील यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अधिक यश संपादन करून समाज व संस्थेचे नाव उज्वल करावे, अशा शुभेच्छा यावेळी त्यांनी व्यक्त केल्या.

## आरक्षण,शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लवकरच आंदोलन

### मनोज जरांगे पाटलांचा सरकारला इशारा

जालना:मराठा आरक्षण, कुणबी प्रमाणपत्र, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातील अनियमितता आणि शेतकरी प्रश्नांवर राज्यभर मोठे आंदोलन उभे करण्याचा इशारा मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. १६ मे रोजी पत्रकार परिषद घेऊन पुढील आंदोलनाची दिशा आणि तारीख जाहीर करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नसल्याने ते हवालदिल झाले असून, न्याय मिळवण्यासाठी समाजाने एकजूट दाखवण्याची गरज असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले. सरकारकडे मायेने आणि विनंतीने मागण्या मांडून उपयोग होत नाही. आता आंदोलनाच्या पवित्र्यात आणि कट्टरतेने उतरल्याशिवाय न्याय मिळणार नाही, असे ते म्हणाले.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातील लाभार्थ्यांना व्याज परताव्याचा लाभ नियमित मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत असल्याचे सांगत त्यांनी सरकारवर निशाणा साधला. महामंडळाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापनातील वादामुळे मराठा समाजातील तरुणांचे नुकसान होत आहे. यासाठी सर्वस्वी सरकारच जबाबदार आहे, असा आरोप त्यांनी केला.सरकार जाणूनबुजून अध्यक्ष आणि अधिकाऱ्यांमध्ये संघर्ष निर्माण करत असल्याचा आरोप करत, या डावपेचांमध्ये मराठा समाजातील तरुणांचे भविष्य अडचणीत आले पान ४ वर




संसाराचे ओझे उंटांच्या पाठीवर लादून रखरखत्या रस्त्यावरून चालणारा भटक्या समाजाचा प्रवास जीवनाच्या संघर्षाची जाणीव करून देतो. डोक्यावर कडक ऊन, पायाखाली गरम रस्ता आणि उद्याच्या शोधात सुरू असलेली त्यांची अखंड भटकंती मन हेलावून टाकते. (छाया : विजय होकर्णे)

## ...तर निदा खानला मदत केली असती-इम्तियाज जलील


छत्रपती संभाजीनगर : निदा खान ही केवळ आरोपी आहे, ती दोषी आढळलेली नाही. तिने मदत मागितली असती तर मी सुद्धा केली असती, असं मोठं वक्तव्य छत्रपती संभाजीनगरचे माजी खा.इम्तियाज जलील यांनी केलं आहे.

नाशिक येथील एका बहुराष्ट्रीय आयटी कँपनीतील कॉर्पोरेट जिहाद आणि बेकायदेशीर धर्मांतर प्रकरणी पोलिसांनी एमआयआएमचा आमदार मतीन पटेल याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. यानंतर पालकमंत्री संजय शिरसाट यांनी एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनादेखील निदा खानला मदत केल्याच्या प्रकरणात सहआरोपी करावे, अशी मागणी केली आहे. संजय शिरसाट यांच्या या आरोपांवर इम्तियाज जलील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कोणीही आपल्यावर आरोप केल्याने आपण दोषी ठरत नाही, अशी भूमिका इम्तियाज जलील यांनी मांडली.

## धर्मांतर प्रकरणातील फरार निदा खान अखेर अटक

### छ.संभाजीनगरमध्ये मध्यरात्री धाडसी कारवाई;एमआयएम नगरसेवक सहआरोपी

नाशिक:गेल्या अनेक दिवसांपासून गाजत असलेल्या टीसीएस धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणातील फरार मुख्य सूत्रधार निदा खान हिला अखेर नाशिक एसआयटी आणि स्थानिक पोलिसांच्या संयुक्त पथकाने छत्रपती संभाजीनगर येथून अटक केली. या कारवाईनंतर प्रकरणातील आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रकरणी निदा खानला



मदत करणाऱ्या एमआयएम नगरसेवकाला सहआरोपी करण्यात आले आहे.

निदा खान ही संभाजीनगरमधील नारेगाव परिसरातील कौसर कॉलनीतील एका निर्जन इमारतीत लपून बसली होती. परिसरात फारशी वर्दळ नसल्याने आणि आजूबाजूला घरांची वस्ती नसल्यामुळे पोलिसांना संशय येणार नाही, असा तिचा अंदाज होता. मात्र तांत्रिक तपास आणि लोकेशन ट्रॅकिंगच्या आधारे ती संभाजीनगरमध्ये असल्याची खात्री नाशिक एसआयटीला पटली.त्यानंतर नाशिक गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांनी सलग दोन दिवस संबंधित इमारतीवर गुप्त नजर ठेवली. ती फ्लॅटमध्येच असल्याचे स्पष्ट होताच मध्यरात्री संयुक्त पथकाने धाड टाकून तिला अटक केली. निदा खान ही तिच्या आई-वडील, भाऊ आणि आत्यासह त्या फ्लॅटमध्ये वास्तव्यास असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे.दरम्यान, अटकेपासून बचाव करण्यासाठी निदा खानने पान ४ वर

## मटका अड्ड्यावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील चिखलवाडी कॉर्नर येथे सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर गुरुवारी सायंकाळी वजिराबाद पोलीसांनी धाड टाकुन चार जणांना अटक करण्यात आली.

चिखलवाडी कॉर्नर या वर्दळीच्या ठिकाणी जुगार अड्डा सुरु करण्यात आला होता. गुरुवारी सायंकाळी वजिराबाद पोलीसांच्या एका पथकाने सदरील जुगार अड्ड्यावर छापा टाकला. लोकांकडून पैसे घेवून मिलन डे नावाचा मटका खेळवीत असतांना अभिषेक राजकुमार वाकडे (वय २६) रा.जुना मोंढा, नांदेड, आकाश राहेरकर रा.जुना मोंढा,नांदेड, अंकुश मोरे रा.रवीनगर, नांदेड व रवी यादव रा.वजिराबाद,नांदेड या चार जणांना पोलीसांनी रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून मटका घेण्याचे साहित्य, रोख रक्कम व मोबाईल पोलीसांनी जप्त केला. पोलीस जमादार शिवसांब मठपती यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद पोलीस ठाण्यात चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बँकांच्या वसुलीचा तगादा थांबवा;सातबारा कोरा करुन पुनर्कर्ज द्या

### हतबल शेतकऱ्यांनी केली सरसकट कर्जमाफीची मागणी

किनवट/प्रतिनिधी-खरीप हंगामातील पीक कर्जाच्या परतफेडीसाठी काही बँकांनी शेतकऱ्यांशी संपर्क वाढवला आहे. चालू बाकीदारांनी नियमीत कर्ज परतफेड केल्यास राज्य सरकार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर पन्नास हजार रुपये अनुदान देणार असल्याची बतावणी करून कर्ज वसुलीचा प्रयत्न केला जात असला तरी किनवट तालुक्यातील शेतकरी बारबारच्या अतिवृष्टीने पुरता हतबल झाल्यामुळे इच्छा असूनही कर्जाची परतफेड करुच शकत नाही. परिणामतः चालू बाकीदार हा प्रोत्साहन, कर्जमाफी आणि पुनर्कर्जापासून वंचित राहतांना दिसतोय. अशा शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र सरकारने आगामी खरीप हंगाम पेरणीसाठी बि-बियाणे, रासायनिक खते उपलब्ध करून देण्यात यावीत, अशी हतबल झालेल्या शेतकऱ्यांची मागणी होताना दिसते.

किनवट तालुक्यातील जवळपास नऊही महसूली मंडळातील शेतकरी मागच्या बारबारच्या अतिवृष्टीच्या विळख्यात सापडला होता. बँकांकडे स्थावर जंगम मालमत्ता तारण ठेवून त्या तुलनेत नगण्य कर्ज दिल्या जाते. आवश्यकतेनुसार पुरक प्रमाणात पीक कर्ज दिल्यास शेतकरी कर्जबाजारी होणार नाही आणि कर्जाची परतफेडही करु शकेल. बँकांच्या शेतकऱ्यांप्रतीची उदासीनता हीच शेतकऱ्यांना थकबाकीच्या खाईत लोटणारी असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. रब्बी हंगामासाठी तर किनवट तालुक्यातील किती शेतकऱ्यांना ह्या बँकांनी पीक कर्ज दिले असेल? याबद्दल प्रश्नचिन्हच आहे. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आणि मराठवाड्याच्या नांदेड जिल्ह्यातील शेवटच्या टोकाला असलेल्या किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कर्जाविषयक समिक्षा केल्यास बँकांच्या मानसिकतेचे वास्तव प्रतिबिंब पहायला मिळेल. थकबाकीदार शेतकऱ्यांना तर कर्जमाफीचा लाभ मिळायलाच हवा. शिवाय चालू बाकीदारांनाही प्रोत्साहन अनुदानाचा लाभ देण्यात यावा. आणि सुधारित पुनर्कर्जापासून एकही शेतकरी वंचित राहाणार नाही अशी महाराष्ट्र सरकारने व्यवस्था करावी ही शेतकऱ्यांची मागणी आहे. बँकांचा वसुलीसाठीचा शेतकऱ्यांमागचा ससेमिरा थांबवायला हवा. कारण खरीप हंगामातील पीक परिस्थिती पासून कोणीही अनभिज्ञ असेल असे वाटत नाही. सरसगट कर्जमाफी करून सर्वांचा ७/१२ कोरा केल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या तुलनेत तिप्पट आधारभूत हमी भाव दिल्यास कर्जासाठी बँकांचे उंबरठे झिजवण्याची मुळीच आवश्यकता नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

## गुरुद्वारा सचखंड बोर्डातील कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी निष्पक्ष चौकशीची मागणी


नांदेड/प्रतिनिधी-गुरुद्वारा सचखंड बोर्डाच्या लेखा विभागामध्ये अनेक महिन्यांपासून कथितरित्या देणगी पावती पुस्तक गायब आहेत. तसेच आर्थिक गैरव्यवहाराच्या गंभीर आरोपांबाबत समाजामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जगदीपसिंघ नंबरदार व अन्य कार्यकर्त्यांनी एका निवेदनाद्वारे गुरुद्वारा बोर्डाच्या प्रशासनाकडे केली आहे.

काही दिवसांपूर्वी भाविकांनी दिलेल्या देणग्यांमध्ये आर्थिक घोटाळा झाल्याचा विषय समोर आला होता. समाजाच्या दबावानंतर संबंधित प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, अनेक महिन्यांपासून लेखा विभागातील अनेक देणगी पावती पुस्तक कार्यालयातून गायब असल्याचा आरोप करण्यात येत असून, या प्रकरणामुळे गुरुद्वारा बोर्डाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यासंदर्भात संबंधित विभागातील काही अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर दुर्लक्ष व निष्काळजीपणाचे आरोप देखील करण्यात आले आहेत. समाजामध्ये या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी जोरदार मागणी प्रशासक डॉ.विजय सतबीरसिंघ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या प्रकरणाची चौकशी न केल्यास आंदोलनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते जगदीपसिंघ नंबरदार, दीपकसिंघ गल्लीवाले, बिरेंद्रसिंघ बेदी, संपूर्णसिंघ गिल, बक्षीसिंघ पुजारी, सिरताजसिंघ बल यांनी निवेदनात दिला आहे.

## तामिळनाडूचा पेच:लोकादेश, राज्यपाल आणि सत्तासमीकरण

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर देशाच्या राजकारणात नवे समीकरण आकार घेत आहे. तीन राज्यांत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे, केरळमध्ये काँग्रेसने आपली पकड कायम राखली आहे; मात्र तामिळनाडूत निर्माण झालेली परिस्थिती ही केवळ एका राज्यापुरती मर्यादित नसून संघराज्य व्यवस्था, राज्यपालांची भूमिका आणि लोकशाही संकेत यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरत आहे. तामिळनाडू विधानसभेत विजय थलपती यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके पक्ष १०८ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. बहुमतासाठी आवश्यक संख्येपेक्षा ते दहा जागांनी कमी पडले. त्यानंतर काँग्रेसच्या पाच आमदारांनी टीव्हीकेला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे सरकार स्थापनेसाठी आवश्यक बहुमतापासून पक्ष आता केवळ चार आमदार दूर आहे. अशा स्थितीत राज्यपालांनी विजय थलपती यांना सत्ता स्थापनेसाठी निमंत्रण न दिल्याने राज्यात राजकीय पेच निर्माण झाला आहे.लोकशाही व्यवस्थेत सर्वात मोठ्या पक्षाला प्रथम सरकार स्थापनेची संधी देणे हा प्रस्थापित संकेत मानला जातो. निवडणुकीत जनतेने कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत दिले नसले, तरी सर्वाधिक जागा मिळवणाऱ्या पक्षाकडे सरकार स्थापनेची क्षमता आहे का, हे पाहणे राज्यपालांचे कर्तव्य असते. त्यासाठी आवश्यक पाठिंब्याची पत्रे सादर करण्याची संधी दिली जाते आणि त्यानंतर विधानसभेच्या पटलावर बहुमत सिद्ध करण्यास सांगितले जाते. सर्वोच्च न्यायालयानेही अनेक निकालांत बहुमताची खरी कसोटी ही राजभवनात नव्हे तर विधानसभेतच पार पडली पाहिजे, असे स्पष्ट केले आहे. याच पार्श्वभूमीवर तामिळनाडूतील घडामोडींकडे पाहिले, तर राज्यपालांचा विलंब संशय निर्माण करणारा ठरतो. जर टीव्हीकेकडे पुरेसा पाठिंबा नसता, तर त्यांना बहुमत सिद्ध करण्यात अपयश आले असते; परंतु संधीच नाकारणे हे लोकादेशाच्या भावनेविरुद्ध मानले जाऊ शकते. राज्यपाल हे संविधानिक पद असले तरी त्यांच्या निर्णयांमध्ये राजकीय तटस्थता अपेक्षित असते. दुर्दैवाने अनेक राज्यांमध्ये राज्यपालांच्या भूमिकेबाबत वारंवार वाद निर्माण झाले आहेत. त्यामुळे तामिळनाडूतील परिस्थिती हा त्या व्यापक प्रश्नाचाच भाग ठरत आहे.दुसरीकडे टीव्हीकेसमोरही आव्हाने कमी नाहीत. सत्तेपासून चार आमदार दूर असताना पक्षाला स्थिर सरकार देण्याची खात्री जनतेसमोर निर्माण करावी लागेल. केवळ अंकगणित पुरेसे नसते; तर राजकीय स्थैर्य आणि प्रशासनक्षमतेवरही विश्वास निर्माण करावा लागतो. विजय थलपती यांची लोकप्रियता मोठी असली, तरी लोकप्रियतेचे मतांमध्ये आणि मतांचे स्थिर सत्तेमध्ये रूपांतर करणे ही खरी कसोटी असेल. काँग्रेसच्या पाठिंब्यानंतर इतर काही अपक्ष किंवा छोट्या पक्षांचा पाठिंबा मिळवण्यात टीव्हीके यशस्वी ठरल्यास राज्यातील राजकीय चित्र झपाट्याने बदलू शकते. या घडामोडींमध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जनतेच्या अपेक्षा. तामिळनाडूच्या मतदारांनी पारंपरिक राजकारणाला काही प्रमाणात नाकारत नव्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. त्यामुळे सत्तास्थापनेत अनावश्यक अडथळे निर्माण झाल्यास लोकांमध्ये असंतोष वाढण्याची शक्यता आहे. लोकशाही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून निवडून आलेल्या प्रतिनिधींना सरकार स्थापनेची न्याय्य संधी देणेही तितकेच महत्त्वाचे असते. तामिळनाडूतील सध्याचा पेच लवकर सोडविणे आवश्यक आहे. राज्यपालांनी घटनात्मक परंपरा आणि लोकशाही संकेत यांचा आदर राखत सर्वात मोठ्या पक्षाला बहुमत सिद्ध करण्याची संधी द्यावी. त्यानंतर अंतिम निर्णय विधानसभेच्या पटलावर व्हावा. कारण लोकशाहीत सत्ता कोणाची हे अखेरीस जनतेच्या प्रतिनिधींनीच ठरवायचे असते, राजभवनाने नव्हे. तामिळनाडूतील हा संघर्ष केवळ सत्तासमीकरणाचा नसून लोकशाही मूल्यांच्या परीक्षेचाही आहे.

# संघर्ष म्हणजे द्वेष नाही, तर समानतेची वाट आहे!




आमचे स्नेही तथा वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष फारुख अहेमद लिखीत 'मुसलमानों का सियासी अजेंडा' या पुस्तकाचे प्रकाशन ९ मे रोजी मुंबईत होत आहे. या पुस्तकाला वंचित बहुजन आघाडीचे सर्वासर्वे अॅड.प्रकाश आंबेडकर यांनी दिलेली प्रस्तावना वाचकांसाठी येथे देत आहोत.

*- संपादक*

भारतीय संविधान हे केवळ शासन चालविण्याचे दस्तऐवज नाही, तर या देशातील वंचित, शोषित, बहिष्कृत आणि उपेक्षित समाजांच्या सामूहिक आशा-आकांक्षांचे घोषणापत्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान रचताना अशा भारताची कल्पना केली होती, जिथे माणसाची ओळख त्याच्या धर्म, जात, पंथ किँवा जन्मावर नव्हे, तर समान नागरिकत्व, सन्मान, संधी आणि न्यायपूर्ण सहभागावर आधारित असेल.

मात्र आज दुर्दैवाने हेच संविधान सतत आव्हानांच्या विळख्यात सापडत आहे. लोकशाहीला बहुसंख्याकवादात रूपांतरित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. सामाजिक न्यायाला प्रतीकात्मकतेपुरते मर्यादित केले जात आहे आणि नागरिकांच्या अधिकारांचे मोजमाप धार्मिक ओळखीच्या कसोटीवर होत आहे. अशा परिस्थितीत देशातील मुस्लिमांसह सर्व वंचित समाजांसमोर सर्वात मोठा प्रश्न उभा राहतो की, त्यांनी केवळ प्रेक्षक राहायचे की इतिहासाची दिशा बदलण्यासाठी हस्तक्षेप करायचा? फारूक अहमद यांच्या भाषणांवर आधारित हे पुस्तक त्या हस्तक्षेपाचेच दस्तऐवज आहे. हे केवळ भाषणांचे संकलन नाही, तर अस्वस्थ काळातील राजकीय इशारा आहे. या पुस्तकात वारंवार एक प्रश्न विचारला गेला आहेमुस्लिम समाजाने केवळ प्रतिक्रियावादी राजकारणात का अडकून राहावे? अन्यायाविरुद्ध फक्त भीती, बचाव किँवा भावनिक प्रतिक्रिया देण्यात अर्थ काय? स्वतःचे मत, संख्या, सामाजिक उपस्थिती आणि वैचारिक ताकद यांना संघटित राजकीय शक्तीत का रूपांतरित करू नये? सत्तर, ऐंशी आणि नव्वदच्या दशकात मुस्लिम समाजाच्या प्रश्नांवर अनेक राजकीय प्रवाह उभे राहत होते. समाजवादी, कम्युनिस्ट, रिपब्लिकन चळवळी आणि नंतर जनता दल यांसारख्या पक्षांनी मुस्लिम प्रश्नांना लोकशाहीचा प्रश्न मानून लढा दिला. मुस्लिम समाज एकटा नव्हता, कारण त्याच्यासोबत विचारांची राजकारण होती. मात्र नंतर राजकारणाचे स्वरूप बदलले. तत्त्वांच्या जागी सत्तेच्या गणितांना महत्त्व आले. जो जिंकतो त्याच्यासोबत जाणे हीच व्यावहारिक राजकारणाची समज निर्माण झाली. त्याचा परिणाम असा झाला की नवे मित्र निर्माण झाले नाहीत आणि जुने सहकारीही दुरावले. दलित, मागास, आदिवासी, भटके-विमुक्त, कामगार आणि अल्पसंख्याकांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्यांना पुरेसा विश्वास दिला गेला नाही. हे गंभीर आत्मपरीक्षणाचे कारण आहे. जो समाज आपल्या नैसर्गिक मित्रांना ओळखत नाही, तो दीर्घकाळ राजकीय एकाकीपणाचा बळी ठरतो. स्वातंत्र्यानंतर मुस्लिम समाजाने धार्मिक अस्तित्व मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. मदरसे उभारले गेले, धार्मिक संघटना निर्माण झाल्या, शिक्षणाच्या क्षेत्रात विशेषतः मुलींच्या शिक्षणात काही प्रमाणात सुधारणा झाली. हे स्वागतार्ह आहे. परंतु केवळ शिक्षण आणि धार्मिक ओळख सुरक्षित करून समाज मजबूत होत नाही. जोपर्यंत राजकीय प्रतिनिधित्व, धोरणनिर्मितीत सहभाग, प्रशासकीय उपस्थिती, संसाधनांवरील हक्क आणि सत्ताकारणात भागीदारी मिळत नाही, तोपर्यंत समाज सुरक्षित होऊ शकत नाही.

मतबँक बनून कुणालाही सन्मान मिळत नाही; भागीदार बनल्यावरच तो मिळतो. गेल्या तीस वर्षांत मुस्लिम समाजाने अनेक पक्षांना बिनशर्त पाठिंबा दिला. बदल्यात ना भीतीमुक्त वातावरण मिळाले, ना सन्मानजनक प्रतिनिधित्व, ना धोरणात्मक सहभाग. त्यांना फक्त मतबँक म्हणून वापरले गेले. ही स्थिती बदलणे गरजेचे आहे. मी दीर्घकाळापासून सांगत आलो आहे की मुस्लिम समाजाने केवळ स्वतःच्या सुरक्षेचे राजकारण न करता, सामूहिक मुक्तीचे राजकारण करायला हवे.



**अॅड.प्रकाश आंबेडकर**
संपादक,प्रबुद्ध भारत
राष्ट्रीय अध्यक्ष,वंचित बहुजन आघाडी

या देशातील एससी, एसटी, ओबीसी, पसमांदा, भटके-विमुक्त, आदिवासी, शेतमजूर, शहरी गरीब आणि धार्मिक अल्पसंख्याक हे वेगवेगळे बेटे नाहीत. त्यांच्या समस्यांचे मूळ एकच आहेसत्ता, संसाधने आणि संधींवर काही मोजक्या प्रभुत्वशाली वर्गांचे नियंत्रण. जर मुस्लिम समाज या वंचित घटकांसोबत जोडला गेला, तर तो फक्त एक समुदाय राहणार नाही, तर परिवर्तनकारी शक्ती बनू शकतो. कारण मुस्लिम समाज या देशातील प्रत्येक राज्यात, जिल्ह्यात, शहरात आणि गावात अस्तित्वात आहे. त्याची उपस्थिती राष्ट्रीय आहे; फक्त त्याचे राजकारणही राष्ट्रीय दृष्टीचे असणे आवश्यक आहे. समान नागरी कायद्याच्या प्रश्नावरही भावनिक प्रतिक्रियेपेक्षा घटनात्मक समज आवश्यक आहे. भारतीय संविधानातील कलम आणि धार्मिक स्वातंत्र्य, श्रद्धा, परंपरा आणि धार्मिक व्यवस्थापनाचा अधिकार देतात. संसदेत बनणारा कोणताही कायदा संविधानाच्या मर्यादेत राहूनच लागू होऊ शकतो. संसद संविधानापेक्षा मोठी नाही.

माझ्या मते देशातील मोठा वर्ग असा आहे, जो समान नागरी कायदा लागू झाला तरी मुस्लिमांच्या वैयक्तिक कायद्यांच्या अधिकाराच्या बाजूने उभा राहण्यास तयार आहे. मुस्लिम समाजात विद्वान, सक्षम वकील आणि घटनात्मक जाण असलेले लोक आहेत. जर मुस्लिम नेतृत्वाने शीख, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, आदिवासी आणि इतर समुदायांशी संवाद साधला, तर अधिकारांच्या प्रश्नांवर व्यापक आघाडी तयार होऊ शकते. परंतु प्रत्येक प्रश्न आम्ही विरुद्ध ते अशा चौकटीत पाहिला, तर दुरावा वाढत जाईल. आज गरज संघर्षाची नाही, तर संवादाधारित घटनात्मक राजकारणाची आहे. आज मुस्लिम समाजात आपले कोणीच नाही, आपण एकटे आहोत अशी भावना वाढली आहे. ही भावना अचानक निर्माण झालेली नाही. राजकारणापासून दुरावा, सामाजिक आघाड्यांचा अभाव, नैसर्गिक मित्रांशी संवाद तुटणे आणि नेतृत्वातील संकुचितता यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. प्रत्यक्षात या देशातील जैन, बौद्ध, शीख, ख्रिश्चन, आदिवासी, दलित, मागास समाज आणि मोठ्या प्रमाणातील उदारमतवादी, लोकशाहीवादी हिंदू नागरिक हे सांप्रदायिक राजकारणाशी असहमत आहेत. त्यांना फक्त एक समान व्यासपीठ मिळालेले नाही.

इस्लामची मूलभूत शिकवण सांगते की अत्याचाराविरुद्ध उभे राहा आणि पीडितांच्या बाजूने उभे राहा. जर मुस्लिम समाज स्वतःपेक्षा वरच्या सामाजिक स्तरातील शक्तींच्या राजकारणात आसरा शोधेल आणि दलित, मागास, आदिवासी, पसमांदा व कामगार समाजांपासून दूर राहील, तर ते ना राजकीय शहाणपण ठरेल, ना धार्मिक नैतिकता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाद्वारे प्रत्येक नागरिकाला समान सन्मान, अधिकार आणि संरक्षण दिले. प्रश्न असा आहे की मुस्लिम समाजाने बहुजन समाजाच्या संघर्षांना तितक्याच गांभीर्याने समजून घेतले का? जर नाही, तर हा दुरावा दोन्ही बाजूंनी नुकसानकारक ठरला आहे. या देशाच्या मातीमध्ये संत आणि सूफी परंपरेचा सांस्कृतिक वारसा आहे. गरीब, मेहनतकऱ्यांचा सामाजिक संबंध दर्गे, संत, पीर आणि लोकपरंपरांशी राहिला आहे. हे नाते सांगते की समाज जमिनीवर कोणासोबत उभा आहे. जर सामाजिक नाते वंचितांशी असेल, तर राजकीय नातेही त्यांच्याशीच असायला हवे; त्या प्रभुत्वशाली शक्तींशी नव्हे, ज्या समाजांना परस्पर भिडवून सत्ता चालवतात. आज ज्या शक्ती दलित, मागास, आदिवासी आणि पसमांदा समाजांना कमकुवत करतात, त्याच शक्ती मुस्लिमांविरुद्धही द्वेषाचा वापर करतात. त्यामुळे वंचित समाजांमध्ये संघर्ष नव्हे, तर ऐक्य निर्माण होणे आवश्यक आहे. मी मुस्लिम समाजाला विशेषतः सांगू इच्छितो की राजकारणापासून दूर राहणे म्हणजे तटस्थता नाही; तर स्वतःचे भविष्य इतरांच्या हाती देणे आहे. जो समाज राजकारणापासून दूर राहतो, त्याला निर्णयप्रक्रियेपासूनही दूर ठेवले जाते. आणि जो समाज वंचितांच्या जबाबदारीसाठी पुढे येतो, तोच नेतृत्वाचा अधिकारी ठरतो.

हा काळ केवळ स्वतःसाठी मागण्यांचा नाही, तर देशाच्या लोकशाही भविष्याच्या रक्षणासाठी उभे राहण्याचा आहे. मुस्लिम समाज जर सामाजिक न्यायाच्या लढ्यात बहुजन समाजासोबत खांद्याला खांदा लावून उभा राहिला, तर तो फक्त स्वतःची सुरक्षा करणार नाही, तर भारतीय संविधानाचेही संरक्षण करेल. फारूक अहमद यांचे हे पुस्तक नव्या पिढीला समजावून सांगण्याचा प्रयत्न करते की राजकारण ही शिवी नाही, तर जबाबदारी आहे; प्रतिनिधित्व हा स्वार्थ नाही, तर अधिकार आहे; संघर्ष म्हणजे द्वेष नव्हे, तर समानतेची वाट आहे; आणि आघाडी म्हणजे कमजोरी नव्हे, तर लोकशाहीची ताकद आहे. हे पुस्तक केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता, संपूर्ण देशातील मुस्लिम, बहुजन, पसमांदा समाज आणि लोकशाहीप्रिय नागरिकांना नव्याने विचार करण्याची, संघटित होण्याची आणि पर्यायी राजकारण उभे करण्याची प्रेरणा देईल, असा मला विश्वास आहे.

जय भीम! जय संविधान!
अल्लाह हाफिज!!

# मांजरम येथे शेतकरी मेळाव्याला जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद

नायगाव/प्रतिनिधी- नायगाव विधानसभा मतदारसंघात सातत्याने समाजोपयोगी व शेतकरी हिताचे उपक्रम राबविणाऱ्या मांजरम गटाच्या माजी जिल्हा परिषद सदस्य पूनमताई राजेश पवार यांच्या संकल्पनेतून मांजरम येथे आयोजित करण्यात आलेला भव्य शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न झाला.

मांजरम येथे पार पडलेल्या या कार्यक्रमास जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी आधुनिक शेती, नैसर्गिक शेती, जलसंधारण आणि गट शेती या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. डॉ. संतोष चव्हाण यांनी नैसर्गिक शेती-काळाची गरज या विषयावर बोलताना रासायनिक शेतीऐवजी सेंद्रिय व नैसर्गिक पद्धतींचा अवलंब करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. जलतारा संकल्पनेचे जनक पुरुषोत्तमजी वायाळ यांनी जलतारा प्रकल्पाचे महत्त्व स्पष्ट करत पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन व साठवण करून शेती अधिक सक्षम करण्याचे मार्ग सांगितले. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी विठ्ठल गीते, कृषी अधिकारी डी. बी. देवरे तसेच माधव तरकंटे यांची प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्यात शेतकरी गट निर्मिती, गट शेतीचे फायदे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपस्थित शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत शेतीविषयक विविध योजनांची माहिती दिली. शेतीत काय करावे आणि काय टाळावे याबाबत त्यांनी प्रभावी



मार्गदर्शन केले. दरम्यान, पूनमताई राजेश पवार यांनी नायगाव मतदारसंघात आजपर्यंत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत.स्व. संभाजी पवार शेतकरी प्रोड्युसर कंपनी, नायगाव यांच्या माध्यमातून मतदारसंघातील अनेक गावांमध्ये शेकडो किलोमीटर पांदण रस्ते, नालासरळीकरण तसेच जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. अनेक गावांसाठी स्वखर्चातून मशिनरी उपलब्ध करून देत ग्रामीण भागातील विकासकामांना गती देण्याचे काम त्यांनी केले असून हा उपक्रम आजही सातत्याने सुरू आहे.

# सायन्स कॉलेजचा एचएससी निकालात पुन्हा झेंडा

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज (ज्युनिअर) ने यंदाच्या एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करत उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षेत महाविद्यालयाचा निकाल ९० टक्के लागला आहे.

या परीक्षेत विशेष प्राविण्यासह १० विद्यार्थ्यांनी यश मिळविले असून प्रथम श्रेणीत ४४ विद्यार्थ्यांनी आपले स्थान अधोरेखित केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.महाविद्यालयातून प्रथम येण्याचा मान सार्थक धनराज सूर्यवंशी याने ८४.१७ टक्के गुण मिळवत पटकावला. प्रनिता संजय सावते हिने ७९.३३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर शिलगंधा दिनराज गायकवाड हिने ७९.०० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ. (सीए) प्रविण पाटील, उपाध्यक्ष अॅड. प्रफुल्ल अग्रवाल, सचिव सौ. श्यामल पत्की, प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, उपप्राचार्या अरुणा शुक्ला, उपप्राचार्य एकनाथ खिल्लारे, पर्यवेक्षक प्रा. सतीश बैनवाड, समन्वयक प्रा. घिरबसी सर तसेच ज्युनिअर कॉलेजमधील सर्व प्राध्यापकांनी केले आहे. महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण यशामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## बसस्थानक परिसरात गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील बसस्थानकजवळ असलेल्या पानपट्टीवर पोलिसांनी छापा टाकून अवैधरित्या गुटखा विक्री करणाऱ्या शैलेश एकनाथ वाघमारे विरोधात कारवाई करत त्याच्या ताब्यातील तीन हजार रुपये किंमतीचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिस उपनिरीक्षक सुनिल बुलंगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद पोलिस ठाण्यात शैलेश वाघमारे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्राच्या पडताळणीमध्ये विलंब

## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले महसूल सहायकाला निलंबित

नांदेड/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील मानसपुरी येथील कु. गजेश्री व्यंकटराव गोरे यांची आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक संवर्गातून जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत कनिष्ठ सहायक या पदावर निवड झाल्यामुळे त्यांच्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी करुन घेवून त्यांना १० मार्च २०२६ पर्यंत नियुक्ती द्यावयाची होती. संबंधित महसुल सहायक माधव हरी फुलवळे यांनी २३ मार्च २०२६ रोजी मुदत संपल्यावर पडताळणी अहवाल सादर केला. त्यामुळे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत कर्तव्यात कसूर केल्याबद्दल महसूल सहायक माधव हरी फुलवळे यांना शासन सेवेतून निलंबित केले आहे.

त्यांच्या प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव जिल्हा परिषद नांदेडकडून जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तो पडताळणीसाठी २३ सप्टेंबर २०२५ रोजी कंधार तहसिलदार यांना पाठविण्यात आला होता. या तहसिल कार्यालयातील महसुल सहायक माधव हरी फुलवळे यांनी २३ मार्च २०२६ रोजी तो पडताळणी अहवाल सादर केला. परंतू या उमेदवाराच्या भरती प्रक्रियेची मुदत ही १० मार्च २०२६ रोजी संपुष्टात आल्यामुळे कु. गजेश्री गोरे यांना शासकिय नोकरी मिळण्यास अडचण निर्माण झाली. ही बाब जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निदर्शनास येताच त्यांनी गांभीर्यपूर्वक दखल घेत संबंधित महसूल सहायक माधव हरी फुलवळे यांना कारणे दाखवा नोटिस बजावून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यामुळे त्यांना शासन सेवेतून निलंबित केले.

# पालाईगुडा-कुपटी मार्ग मृत्यूचा सापळा;निष्काळजीपणामुळे नागरिकांचा जीव धोक्यात



माहूर/प्रतिनिधी-पालाई-गुडा ते कुपटी दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाने नागरिकांच्या संतापाचा उद्रेक झाला असून संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीच्या भोंगळ कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कोणतेही नियोजन न करता रस्ता दोन्ही बाजूंनी खोदून ठेवल्याने हा मार्ग अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे.

गुरुवार दि.७ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे संपूर्ण रस्त्यावर चिखल आणि खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले असून अनेक दुचाकीस्वार घसरून अपघातग्रस्त झाले आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काम सुरू करताना एक बाजू वाहतुकीसाठी खुली ठेवणे आवश्यक असताना ठेकेदाराने संपूर्ण रस्ता उकरून नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू केला आहे. रस्त्यावर कुठेही इशारा फलक नाहीत, सुरक्षा उपाययोजना नाहीत, पर्यायी मार्ग नाही, त्यामुळे दररोज प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी परिस्थिती अत्यंत भीषण बनत असून एखादा मोठा अपघात झाल्यास त्याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. विकासाच्या नावाखाली नागरिकांचा बळी घेण्याचा हा प्रकार आहे का? असा रोष ग्रामस्थांनी व्यक्त केला. संबंधित विभागाचे अभियंते, अधिकारी आणि गुत्तेदार हे नेमके कुठे गायब झाले आहेत, असा सवालही उपस्थित होत आहे. केवळ कागदोपत्री कामे दाखवून नागरिकांच्या सुरक्षिततेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे. प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून संबंधितांवर कारवाई करावी, रस्त्यावरील धोकादायक परिस्थिती त्वरित सुधारावी आणि अपघातांना कारणीभूत ठरणाऱ्या निष्काळजी अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# उपजिल्हा रुग्णालयातील सात वैद्यकीय अधिकारी गैरहजर

मुखेड/प्रतिनिधी-जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयाला ५ मे रोजी अचानक भेट दिली असता रुग्णालयातील १४ पैकी ७ वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित आढळून आले. या प्रकारणाची दखल घेत डॉ. पेरके यांनी अनुपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एका दिवसाच्या पगार कपातीसह नोटीस देण्याचे आदेश प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. बालाजी आदमपूरकर यांना दिले आहेत.

या कारवाईमुळे आरोग्य विभागात खळबळ उडाली असून गैरहजर राहिलेल्या डॉक्टरांना आता खुलासा सादर करावा लागणार आहे. मुखेड येथे १०० खाटाचा दवाखाना असून येथे १ वैद्यकीय अधिक्षक व १४ वैद्यकीय अधिकारी अशी पदे आहेत. यातील काही डाक्टराचे खाजगी रुग्णालये असून त्याना येथे येण्यास रस नाही. काही डाक्टर सलग २४ तास ड्युटी करून आठ दिवस मोकळे होतात. त्यामुळे येथील रुग्णाना वैद्यकीय सेवा बरोबर मिळत नाही. मंगळवारी सकाळी ९ वाजता करण्यात आलेल्या या अचानक पाहणीत त्यांनी रुग्णालयाची इमारत व परिसराची सखोल तपासणी केली. स्त्री व पुरुष वॉर्डमध्ये भेट देऊन रुग्णांना मिळणाऱ्या वैद्यकीय सेवांचा आढावा घेतला. रुग्णालयातील स्वच्छता अधिक चांगल्या प्रकारे राखण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# पंचशील माध्यमिक विद्यालयाचा ८१ टक्के निकाल



हदगाव/प्रतिनिधी-शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्यमिक विद्यालयाचा ८१ टक्के निकाल लागला आहे शाळेतून ३८४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ३११ विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत.

२९ विद्यार्थी विशेष प्राविण्यत,प्रथम श्रेणीत ८९ तर ११० द्वितीय श्रेणी उत्तीर्ण झाले आहेत. हदगाव तालुक्यातून दहावीला सर्वात जास्त विद्यार्थी परीक्षेला बसवणारी शाळा म्हणून या शाळेकडे पाहिले जाते.शाळेतून कु.अंकिता शेळके हिने ९१.४०, कु.श्रुती मनवर ९०.६०, कु.कोमल फरकुंडे ९०.२०, शिंदे ऋषिकेश ८८.८०, कोकरे नैतिक ८८.२०, संजीत गिरबिडे ८७.६०, दिव्या बंमरुळे ८७.४०, कु.गायत्री वाकोडे ८७.२०, कु.भिसे अनुष्का हिने ८७ टक्के गुण मिळवले आहेत.सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव सुनील सोनुले सह सर्व संचालक,मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर,इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक श्रीमती वर्षा वानखेडे, प्रशांत पतंगे, अमोल नरवाडे, नारायण काळबांडे व जनार्दन देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.

# जंगलातील जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

माहूर/प्रतिनिधी-तालुक्यातील मालवडा परिसरातील क्रेशर शेजारी जंगलात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर माहूर पोलिसांनी धाड टाकून दोन जणांना अटक केली. इतर चार जण पळून गेले आहेत.

७ मे रोजी दुपारी मालवडा परिसरातील जंगलात काही जण जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक शरद घोडके यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक तयार करून संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच चार जण घटनास्थळावरून पसार झाले, तर दोन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणात एकूण सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई दरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून ४ हजार २५० रुपये रोख रक्कम, दोन पत्त्यांचे संच, तीन मोबाईल फोन तसेच दोन मोटारसायकली जप्त केल्या. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ६५ हजार २५० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सागर डरंगे यांच्या फिर्यादीवरून माहूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# गंगाचाळ-डंकीन रोड येथे ९ मे रोजी सैलानी बाबांचा संदल

नांदेड/प्रतिनिधी-गंगाचाळ, डंकीन रोड परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही हजरत हाजी अब्दुल रहेमान उर्फ सैलानी बाबा यांच्या संदल सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले आहे. शनिवार, दि. ९ मे रोजी सायं७ वाजता हा धार्मिक कार्यक्रम पार पडणार असून, सैलानी बाबा भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आयोजकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संदलचा मार्ग मार्कंडेय मंदिर परिसरातून सुरू होऊन डंकीन समोरील दर्गा येथे समाप्त होणार आहे. धार्मिक एकात्मता, श्रद्धा आणि सामाजिक सलोखा जपणारा हा सोहळा दरवर्षी मोठ्या भक्तिभावात साजरा केला जातो.या कार्यक्रमास संतबाबा बलविंदरसिंघजी कारसेवावाले यांची विशेष उपस्थिती लाभणार असून, प्रमुख उपस्थिती म्हणून आ. आनंदराव बोंढारकर हे उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून गणपत धबाले, रमेश गोडबोले, ॲड. विकास वाघमारे, शशिकांत अण्णा भुसेवार, पप्पू (प्रदीप) जाधव, अमजद खान, मोसिन खान, राहुल भुसेवार, विश्वनाथ घडलींगे, अनिल गाडेळा, सत्यपाल सावंत, अनिल गोडबोले, विश्वनाथ वाघमारे, अरशद भाई, राहुल सोनसळे, संतोष शिंदे, बिट्टुसिंघ महाराज, बबु काकडे, खयूम खान, केशव नवरे, राजुसिंघ महाराज, मुकुंद भोळे, सोहेल खान आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सैलानी बाबा भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड यांच्या न्यायालयात
समक्ष श्री.डी.एस.निंबाळकर साहेब २ रे सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.५२५/२०२६

अर्जदार : १) वहीदाबी शेख मोहम्मद वय-६३ वर्ष-व्यवसाय घरकाम, २) शेख जावेद शेख मोहम्मद वय-४६ व्यवसाय-व्यापार, ३) फरीदा बेगम शेख इकबाल वय-१७ व्यवसाय-घरकाम रा.मोमीनपुरा इतवारा नांदेड, ४) शेख वाजीद शेख मोहम्मद वय-३८ व्यवसाय-व्यापार, ५) शेख माजीद शेख मोहम्मद वय-३६ व्यवसाय-व्यापार वादी क्र.१,२,४ आणि ५ राहणार खडकपुरा नांदेड.

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे. ज्याअर्थी अर्जदार मयत शेख मोहम्मद अब्दुल रहमान यांचे वारस आहेत. मयत शेख मोहम्मद अब्दुल रहमान यांचा मृत्यू दि.८/२/२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक ९/६/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ७/५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
२ रे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## जाहीर प्रगटन

श्री के.एस.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,उमरी
यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२७/२०२६
विश्वास व इतर वि.निरंक

प्रकरण : मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : १. विश्वास पुंडलीकराव गोवंदे, वय ४७ वर्षे, व्यवसाय-मजुरी, २. जयश्री पुंडलीकराव गोवंदे, वय ४४ वर्षे, व्यवसाय-घरकाम, ३. संदीप पुंडलीकराव गोवंदे, वय ३७ वर्षे, व्यवसाय-मजुरी, तिघे रा.आंबेडकरनगर, उमरी ता.उमरी जि.नांदेड, ४. ज्योती विजय कांबळे, वय ४० वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.बीटरगांव ता.यवतमाळ, ५. सुजाता दिगांबर सावंत वय ४३ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.लहान ता.अर्धापुर जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

मयत सावित्रीबाई पुंडलीकराव गोवंदे, यांचे दिनांक २८/१०/२०२४ रोजी मयत पुंडलीक नागोजी गोवंदे, यांचे दिनांक १०/०७/१९९२ रोजी मौजे उमरी ता.उमरी जि.नांदेड, येथे आकस्मीक निधन झाले.

सदरिल जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार १. विश्वास पुंडलीकराव गोवंदे, वय ४७ वर्षे, व्यवसाय-मजुरी व इतर ४ रा.आंबेडकरनगर, उमरी ता.उमरी जि.नांदेड. हे मयताचे वारस असुन त्यांचे व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत सावित्रीबाई पुंडलीकराव गोवंदे व पुंडलीक नागोजी गोवंदे, यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील श्री.बी.जी.सवई, यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरिल प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की, प्रस्तुत प्रकरणात वरिल बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणने सदरिल जाहिर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक १६/०६/२०२६ पर्यंत विहीत मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक ३०/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

स्वाक्षरित/-
**वरिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरी
जि.नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरी
जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

श्री के.एस.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,उमरी
यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२६
सुजाताबाई व इतर वि.निरंक

प्रकरण : मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : १. सुजाताबाई गंगाधर एडके, वय ४८ वर्षे, व्यवसाय-घरकाम, २. लक्ष्मण गंगाधर एडके, वय ३० वर्षे, व्यवसाय-मजुरी, ३. गौतम गंगाधर एडके, वय २७ वर्षे, व्यवसाय-मजुरी, तिघे रा. कळगाव ता.उमरी जि.नांदेड, ४. दिक्षा संतोष कांबळे, वय ३५ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.दापका राजा ता.मुखेड जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

मयत गंगाधर प्रभाजी एडके, यांचे दिनांक ०३/०४/२०२५ रोजी गांधी हॉस्पीटल हैद्राबाद येथे उपचारा दरम्यान निधन झाले.

सदरिल जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार १. सुजाताबाई गंगाधर एडके, वय ४८ वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा.कळगाव ता.उमरी जि.नांदेड व इतर ३ हे मयताचे वारस असुन त्यांचे व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत गंगाधर प्रभाजी एडके, यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील श्री.बी.जी.सवई, यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरिल प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की, प्रस्तुत प्रकरणात वरिल बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणने सदरिल जाहिर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक ०९/०६/२०२६ पर्यंत विहीत मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक ३०/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

स्वाक्षरित/-
**वरिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरी
जि.नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरी
जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

श्री के.एस.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,उमरी
यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२२/२०२६
गोदावरीबाई व इतर वि.निरंक

प्रकरण : मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : १. गोदावरीबाई महाराज गायकवाड, वय ६५ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.उमरी ता.उमरी जि.नांदेड, २. सदानंद बाबु महाराज गायकवाड, वय ४३ वर्षे, व्यवसाय-नौकरी, ३. गजानन महाराज गायकवाड, वय ३५ वर्षे, व्यवसाय-मजुरी, तिघे रा.रापतवार नगर उमरी ता.उमरी जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

मयत गायकवाड महाराज लक्ष्मण, यांचे दिनांक ०१/०१/२०२६ रोजी त्यांच्या राहत्या घरी रापतवारनगर उमरी ता.उमरी जि.नांदेड येथे निधन झाले.

सदरिल जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार १. गोदावरीबाई महाराज गायकवाड, वय ६५ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.उमरी ता.उमरी जि.नांदेड. व इतर २ हे मयताचे वारस असुन त्यांचे व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत गायकवाड महाराज लक्ष्मण, यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील श्री.बी.जी.सवई, यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरिल प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की, प्रस्तुत प्रकरणात वरिल बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणने सदरिल जाहिर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक ०९/०६/२०२६ पर्यंत विहीत मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक ३०/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

स्वाक्षरित/-
**वरिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरी
जि.नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरी
जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.६३३/२०२६

अर्जदार : १. मिराताई भ्र.आशिष भास्करे वय ३४ वर्ष धंदा घरकाम, २. मनस्वी पि.आशिष भास्करे वय ९ वर्ष धंदा शिक्षण, ३. रक्षीता पि.आशिष भास्करे वय २ वर्ष अर्जदार क्र.२ व ३ अनुपालनकर्ता अर्जदार क्र.१, ४. संगिता भ्र.मनोहर भास्करे वय ६५ वर्ष धंदा घरकाम, ५. मनोहर पि.रावजी भास्करे वय ७१ वर्ष धंदा पेन्शनर रा.सर्व विकास नगर तरोडा बु.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निल

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे. ज्याअर्थी अर्जदार मयत आशिष पि.मनोहर भास्करे यांचे वारस आहेत. मयत आशिष पि.मनोहर भास्करे यांचा मृत्यू दि.२६/०२/२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक २४/०६/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०७/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
५ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# आरटीओ कॅम्पमुळे सा.बां.कार्यालयाला अघोषित सुट्टी

उमरखेड/प्रतिनिधी- महिन्यातून तीन दिवस असणाऱ्या आरटीओ कॅम्पमुळे उमरखेड मधील शासकीय विश्रामगृह आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (सा.बां.) यांच्यावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून आज आरटीओ कॅम्प आहे, तर मग सा.बां.ला अघोषित सुट्टीच आहे की काय ? अशी परिस्थिती उमरखेड तालुक्यात निर्माण झाली आहे. कार्यालयीन कामासाठी कार्यालयात दूरवरून येणारे आल्या पावलीच वापस जात असल्याचे चित्र समोर येत असून या व्यतिरिक्त शासकीय विश्रामगृहाचा गैरवापर होत असल्याची ओरड नागरिकांमध्ये होत आहे.

आरटीओ कॅम्पच्या काळात विश्रामगृह परिसरात वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून, संबंधित दिवशी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उपलब्ध नसतात, प्रभारी उपविभागीय अभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्यासह संपूर्ण टीम साइटवर असल्याचे सांगितले जाते, उलट या दिवशी कार्यालयाच्या आवारात आरटीओ कर्मचारी आणि एजंटांचाच वावर मात्र मोठ्या प्रमाणात असतो. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामासाठी कार्यालयात गेल्यावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. आठवड्यातील पाच दिवस कामकाज अपेक्षित असताना, कॅम्पच्या दिवशी कार्यालयीन व्यवस्था कोलमडल्याचे चित्र समोर येते. या शिवाय येथील काही कर्मचाऱ्यांकडून टेबल, खुर्च्या यांसारखे शासकीय साहित्य आरटीओ एजंटांना भाड्याने दिले जात असल्याचेही बोलल्या जात आहे. यामुळे शासनाच्या मालमत्तेचा गैरवापर होत असल्याचा गंभीर मुद्दा समोर येत आहे.

या व्यतिरिक्त विश्रामगृहातील दोन व्हीआयपी कक्ष एका खाजगी व्यक्तीच्या ताब्यात असून, तेथे कोणतीही अधिकृत पावती न देता वेगळीच सेवा चालवली जात असल्याचा आरोप आहे. हा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू असूनही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे मत व्यक्त करण्यात येत असून सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून शासकीय विश्रामगृहातील अनागोंदी कारभार तात्काळ थांबवून संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

कॅम्पच्या दिवशी महागाव रोडवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने शाळकरी मुले व सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने वाहतूकची कोंडी होत असल्याचे चित्र विशेषतः या काळात दिसून येते.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याला अडथळा निर्माण करणारा पेट्रोल पंप तात्काळ हटवण्याकरिता आम्ही अश्वारूढ पुतळा कृती समितीचे पदाधिकारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात निवेदन देण्याकरिता गेलो असता त्यावेळी एकही अधिकारी किंवा कर्मचारी कार्यालयात उपस्थित नव्हते संबंधित अधिकाऱ्याला भ्रमणध्वनी वरून संपर्क साधला असता त्यांनी काहीच उत्तर दिले नाही.

**-अभय पवार**

अध्यक्ष छ.शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा कृती समिती उमरखेड.

# कुंडलवाडीतील शाळांचा दहावीचा निकाल जाहीर

कुंडलवाडी/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, कुंडलवाडी शहर व परिसरातील विविध शाळांनी यंदाही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अनेक शाळांनी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची छाप उमटविली आहे.

जिल्हा परिषद हायस्कूल, कुंडलवाडीचा निकाल ६० टक्के लागला असून जिल्हा परिषद हायस्कूल उर्दू माध्यमाने शंभर टक्के निकालाची नोंद केली आहे. के रामलू पब्लिक स्कूल इंग्लिश मीडियम, कुंडलवाडीनेही १०० टक्के निकाल मिळवत विशेष यश संपादन केले आहे. मिलिंद विद्यालय, कुंडलवाडीचा निकाल ९४.९६ टक्के लागला असून कै. गंगाबाई पोतन्ना सब्बनवार मुलीचे हायस्कूल, कुंडलवाडीने ९५.६५ टक्के निकालाची उज्वल कामगिरी केली आहे. तसेच संत कबिर विद्यालय, पिंपळगावचा निकाल ७३.९१ टक्के तर सोन्याबाई ठक्करवाड विद्यालय, हूणगुंदा येथील निकाल ८०.६४ टक्के लागला आहे. दहावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संबंधित संस्थांचे अध्यक्ष, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# गुटखा माफियांचा नायगाव तालुक्यात सुळसुळाट;पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

नायगाव/प्रतिनिधी-राज्यात २०२२ पासून गुटखा बंदी लागू असतानाही नायगाव तालुक्यात खुलेआम गुटख्याची विक्री सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. सार्वजनिक आरोग्याचा विचार करून राज्य शासनाने गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू व तत्सम पदार्थांवर बंदी घातली असली तरी नायगाव शहरासह तालुक्यातील गावागावांत किराणा दुकाने, जनरल स्टोअर्स आणि पानटपऱ्यांवर राजरोसपणे गुटखा विक्री होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परराज्यातून मोठ्या प्रमाणावर गुटखा नांदेडमार्गे नायगाव तालुक्यात आणला जात असून काही गावांमध्ये त्याचे साठवण केंद्र तयार करण्यात आल्याची चर्चा आहे. विशेषतः नायगाव तालुक्यातील कहाळा परिसर हा गुटखा पुरवठ्याचे प्रमुख केंद्र बनल्याचे बोलले जात आहे. तेथून तीन तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुटख्याचा पुरवठा केला जात असल्याची माहिती समोर येत आहे.गुटखा बंदी असूनही हा अवैध व्यवसाय बिनधास्त सुरू असल्याने अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेकवेळा वाहने पकडली जातात, चालकांवर कारवाई होते; मात्र मुख्य सूत्रधारांपर्यंत कारवाई पोहोचत नसल्याने गुटखा माफियांचे मनोबल वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.स्थानिक स्तरावर काही पोलिस कर्मचाऱ्यांचे गुटखा माफियांशी साटेलोटे असल्याच्या चर्चांमुळे पोलिस विभागाची प्रतिमा मलिन होत आहे. गुटखा वाहतूक आणि विक्रीला संरक्षण मिळत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे बंदी असलेला गुटखा खुलेआम विकला जात असताना पोलिस आणि संबंधित यंत्रणा नेमके काय करत आहेत, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. दरमहा लाखो रुपयांची उलाढाल या अवैध व्यवसायातून होत असल्याचे सांगितले जात असून युवकांमध्ये वाढत्या व्यसनाधीनतेबाबत पालकवर्गातून चिंता व्यक्त होत आहे. गुटखा माफियांवर कठोर कारवाई करून या अवैध धंद्याला आळा घालावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# टेंडर प्रक्रिया पारदर्शक करण्याची नगरसेवकांची मागणी

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव नगरपरिषदेच्या सभागृहात दि.५ मे रोजी सकाळी ११ वाजता महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. शहराच्या नागरी विकासाशी संबंधित विविध विषयांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः घनकचरा व्यवस्थापनाचा विषय बैठकीत केंद्रस्थानी होता. बैठकी दरम्यान शिवसेना गटनेते गोपाल सारडा तसेच माजी नगराध्यक्ष अमित अडसूळ यांनी नगरपरिषदेच्या विविध कामांच्या निविदा (टेंडर) केवळ एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध न करता रोटेशन पद्धतीने सर्ववर्तमान पत्रांमध्ये प्रकाशित करण्याची जोरदार मागणी केली.

यावेळी गोपाल सारडा यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सुनावले की, वारंवार एकाच वर्तमानपत्रात निविदा प्रसिद्ध केल्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. टेंडर प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा पक्षपात अथवा अपारदर्शकता सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.जनतेने आमच्यावर ठेवलेला विश्वास अबाधित राहिला पाहिजे. नगरपरिषदेची टेंडर प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असणे आवश्यक आहे, असे सांगत त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे याबाबत जाब विचारला. बैठकीस नगराध्यक्ष रोहिणी भास्कर वानखेडे, शिवसेना गटनेते गोपाल सारडा, माजी नगराध्यक्ष अमित अडसूळ, मुख्याधिकारी तसेच सर्व नगरसेवक उपस्थित होते. नागरी विकास कामांचा आढावा घेण्याबरोबरच प्रशासनिक कामकाजात सुधारणा करण्याबाबतही विस्तृत चर्चा करण्यात आली. पत्रकारांना सभागृहात प्रवेशाबाबत नाराजी दरम्यान, नगरपरिषद निवडणुकीच्या काळात स्थानिक पत्रकारांना सभागृहातील कामकाजाच्या वृत्तांकनासाठी संपूर्ण संधी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात पत्रकारांसाठी स्वतंत्र दालन अथवा बसण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याची चर्चा शहरात सुरू आहे. काही नगरसेवकांच्या विरोधामुळे पत्रकारांना सभागृहात रिपोर्टिंगसाठी पुरेसा वाव मिळत नसल्याची खंत पत्रकारांकडून व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे प्रशासनाकडूनही परवानगी मिळण्यात अडचणी येत असल्याचे सांगितले जात आहे. निवडणुकीत दिलेली आश्वासने नंतर विसरली जातात, असा अनुभव पत्रकारांना येत असल्याची प्रतिक्रिया स्थानिक स्तरावर उमटत आहे.

# मुखेडात मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटवले

मुखेड/प्रतिनिधी- शहरातील बसस्थानक ते महाजन पेठ या वर्दळीच्या शहरातंर्गत जाणाऱ्या रस्त्यावर भाजी विक्रेते व फेरीवाल्यामुळे सर्व सामान्य नागरिकाना ये-जा करणे जिकीरीचे झाले होते. त्यामुळे रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात यावी, अशी मागणी केली जात होती. वाढत्या तक्रारी लक्षात घेता स्थानिक पोलीस प्रशासनाने अतिक्रमण काढण्यासासाठी पुढाकार घेत या रस्त्यावरील सर्व अतिक्रमण काढून हा मार्ग रहदारीसाठी खुला करण्यात आला. त्यामुळे हा रस्ता सध्या मोकळा श्वास घेत आहे.

मुखेड न.प.च्या वतीने भाजी विक्रेत्यांसाठी शहरातील हुतात्मा स्मारक परिसरात मोठा निधी खर्च करुन ओट्याचे बांधकाम करुन दिले होते. त्यानंतर दर सोमवारी या ठिकाणी बाजार भरत होता. उर्वरीत दिवशी भाजी विक्रेते बसस्थानक ते महाजन पेठ रस्त्यावर आपली दुकाने थाटुन व्यवसाय करीत होती. दरम्यान, यामुळे पुन्हा रस्त्यावर वाहतूक कोंडी निर्माण होती. येथील हातगाड्यांसह रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात यावे, अशी मागणी केली जात होती. नागरिकांच्या वाढत्या तक्रारी व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेता पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांनी पोलीस बंदोबस्तात हा रस्ता खुला करुन दिला.या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक जावेद शेख, पोलीस कर्मचारी प्रदीप शिंदे, यादव, इबीतवार, फय्याजोद्दीन, चव्हाण आदी कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. पोलीस प्रशासनाने पुढाकार घेवून अतिक्रमण काढल्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे. तर भविष्यात या रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण होऊ नये, अशी काळजी नगर पालिकेने घ्यावी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# धनादेश अनादार प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

मुदखेड/प्रतिनिधी- धनादेश अनादार प्रकरणी मुदखेड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने पुराव्याअभावी आरोपी माधव संभाजी तोटेवाड यांची निर्दोष मुक्तता केली आहे.

या प्रकरणातील तक्रारदार यांनी माधव संभाजी तोटेवाड रा.शिवणगाव यांच्या विरोधात २ लाख ५० हजार रुपयांचा धनादेश अनादरित झाल्या प्रकरणी मुदखेड न्यायालयात धाव घेतली होती. मागील १ वर्षे १० महिन्यापासून या खटल्याची सुनावणी न्यायालयात सुरू होती. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आणि सादर केलेले पुरावे तपासल्यानंतर, न्यायालयाने निष्कर्ष काढला की तक्रारदार आपली बाजू सिद्ध करण्यास अपयशी ठरले आहे त्यामुळे न्यायालयाने आरोपीची या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली आहे. या निकालामुळे सत्य परिस्थिती समोर आल्याची भावना व्यक्त होत आहे.या प्रकरणात आरोपीच्या वतीने मुदखेड न्यायालयातील ॲड. अमोल एम. भुरे यांनी काम पाहिले व आरोपीस निर्दोष सुटका करण्यासाठी परिश्रम घेतले.

# ग्रामीण भागातही जारच्या पाण्याला मागणी

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यासह हाणेगाव, मरखेल करडखेड, माळेगाव, शहापूर, लोणी, अंबुलगा, या ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा जार व्यवसायाकडे तरुणांचा कल मोठ्या प्रमाणात वाढत आहे. कमी गुंतवणूक सुरू होणारा आणि वर्षभर मागणी असलेला हा व्यवसाय अनेक युवक युवतींसाठी रोजगाराचा हक्क पर्याय ठरवत आहे.

देगलूर तालुक्यातील गावा गावात शुद्ध पाण्याची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषता; उन्हाळ्यात पाण्याची टंचाई आणि पाण्याच्या गुणवत्तेतील घसरण यामुळे नागरिक जार मधील शुद्ध पाण्याला प्राधान्य देत आहेत. शाळा, कार्यालय, महाविद्यालय, हॉटेल्स, किराणा दुकाने तसेच घरगुती वापरासाठी जायची मागणी सातत्याने वाढत आहे. या व्यवसायासाठी पाणी शुद्धीकरण यंत्रणा, जार, आणि वाहतुकीसाठी कारणे सातत्याने वाढत आहे. सुरुवातीला मर्यादित प्रमाणात अन्नपुरवठा करणारे हे तरुण असा मोठाचखौ हे तरुण आता मोठा ग्राहक वर्ग तयार करून सांगा नका मिळवावा या अपेक्षा आहेत. जार पुरवठा करणारी हे तरुण आता मोठा ग्राहक वर्ग तयार करून चांगला नफा मिळवत आहेत. मात्र या व्यवसायात काही अडचणी देखील आहेत. विजेचा कपुरा पुरवठा, पाण्याचे स्त्रोत कमी होणे आणि वाढती स्पर्धा यामुळे व्यवसायात अडथळे येत आहेत. याशिवाय काही ठिकाणी ग्राहकांची फसवणूक होत असल्याचीही समोर येत आहे. योग्य प्रकारे पाणी शुद्ध न करता त्यात बर्फ टाकून थंड पाणी देण्यात येत असल्याने आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्राहकांनी पाण्याची गुणवत्ता तपासूनच वापर करणे गरजेचे आहे. एकंदरीत, ग्रामीण भागात पाणी जार व्यवसाय हा केवळ पाण्याचा पुरवठा करणारा उद्योग न राहता, तरुणांसाठी आर्थिक स्थैर्य आणि स्वालंबनाचा मजबूत आधार बनत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# पश्चिम बंगालची सूत्रे सुवेंदू अधिकारींच्या हाती

नवी दिल्ली:पश्चिम बंगालमध्ये भाजपने ममता बॅनर्जी यांची १५ वर्षांची सत्ता उलथवून लावत विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवला. अशामध्ये विजयानंतर मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर भाजपने स्पष्ट केले आहे की, सुवेंदू अधिकारीच भाजपकडून पश्चिम बंगलाचे पहिले मुख्यमंत्री बनतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दौऱ्या असून आज सुवेंदू अधिकारी यांची विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड करण्यात आली.पश्चिम बंगालला दोन उपमुख्यमंत्री मिळणार असून त्यापैकी एक उपमुख्यमंत्रीपद हे प्रसिद्ध अभिनेत्री आणि नेत्या रूपा गांगुली यांचे नाव निश्चित झाले असल्याचे कळते. त्यांच्यासोबतच दुसरा उपमुख्यमंत्री उत्तर बंगालमधील पुरुष लोकप्रतिनिधी असणार आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री नागेश वि.पवार)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६२२/२०२६
विजयकुमार व इतर वि.निरंक

अर्जदार : १. विजयकुमार किशनराव कांबळे, वय : ६० वर्षे धंदा : सेवानिवृत्त, २. इटग्याळकर सुयोग विजयकुमार, वय : ३२ वर्षे धंदा : नौकरी, रा.प्लॉट क्र.१९, सुयोग निवास, सप्तगिरी कॉलनी, तरोडा बु.जि.नांदेड, ३. इटग्याळकर सुचिता विजयकुमार उर्फ सुचिता अनिल हनुमंते, वय : ३१ वर्षे धंदा : घरकाम, रा.प्लॉट क्र.१९, सुयोग निवास, सप्तगिरी कॉलनी, तरोडा बु.,जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत प्रेमा विजय कुमार कांबळे यांचे वारस आहेत. मयत प्रेमा विजय कुमार कांबळे यांचा दिनांक २१/०३/२०२६ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमुद केले आहे की, अर्जदार क्र.१ हा मयताचा पती, अर्जदार क्र.२ हा मयताचा मुलगा व अर्जदार क्र.३ ही मयताची मुलगी आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी,प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक १६/०६/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०२/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
६ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री ए.जी.चव्हाण)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५२९/२०२६
शबाना व इतर वि.निल

अर्जदार : १) शबाना बेगम भ्र.अब्दुल जमील वय : ५३ वर्ष, व्यवसाय : घरकाम, २) मोहम्मद जमीर पि.अब्दुल जमील वय : ३३ वर्ष, व्यवसाय : व्यापार, ३) मोहम्मद जफर पि.मोहम्मद जमील वय : २९ वर्ष, व्यवसाय : व्यापार, ४) मो.जाकेर अहमद पि.जमील अहमद वय : २५ वर्ष, व्यवसाय : व्यापार सर्व राहणार करबला रोड, इतवारा,नांदेड मो.८३२९९०२९९५

विरुद्ध

निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत अब्दुल जमील अब्दुल गफ्फार यांचे वारस आहेत. मयत अब्दुल जमील अब्दुल गफ्फार यांचा दिनांक १९/१०/२०२५ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे की, अर्जदार क्र. आहेत.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी,प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ९/६/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ७/५/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
७ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

पान १ वरुन

### दहावी निकालात...

उत्तीर्ण झाले आहेत. निकालात कोकण विभागाने पुन्हा एकदा राज्यात अव्वल स्थान पटकावत ९७.६२ टक्के निकालाची नोंद केली. तर सर्वात कमी निकाल छत्रपती संभाजीनगर विभागाचा ८८.४१ टक्के लागला आहे. लातूर विभागाचा निकाल ८८.४२ टक्के लागला असून तो दुसऱ्या क्रमांकाने कमी ठरला आहे. मंडळाच्या माहितीनुसार, यंदाची परीक्षा अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. विशेष म्हणजे, ६४ पैकी तब्बल २० विषयांचा निकाल १०० टक्के लागल्याची उल्लेखनीय बाब समोर आली आहे.

### आरक्षण,शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर...

आहे. अनेक युवक कर्जबाजारी होत असून त्यांचे सिव्हिल रेकॉर्ड खराब होत आहेत, असे जरांगे पाटील म्हणाले.सारथी संस्था, अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ तसेच कुणबी प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र वितरणातही सरकारकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप त्यांनी केला. कुणबी प्रमाणपत्र आणि व्हॅलिडीटी सरकार जाणूनबुजून देत नाही. या सर्व प्रश्नांवर राज्यभर मोठे आंदोलन उभे राहणार असून त्याची घोषणा १६ मे रोजी करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

### धर्मांतर प्रकरणातील...

स्वतःला गरोदर असल्याचा दावा करत वैद्यकीय कागदपत्रांच्या आधारे अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र नाशिक जिल्हा न्यायालयाने हे प्रकरण केवळ वैयक्तिक वाद नसून आंतरराष्ट्रीय सिंडिकेटशी संबंधित असल्याचे नमूद करत तिचा जामीन अर्ज वारंवार फेटाळला होता. जामीन फेटाळल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत पोलिसांनी तिला अटक करण्यात यश मिळवले.या प्रकरणातील अन्य आरोपी शाहरुख कुरेशी आणि रझा मेमन यांनाही पुढील तपासासाठी पुन्हा पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. मुंबई नाका पोलिसांकडून दोघांची कसून चौकशी सुरू असून त्यांना आज न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.पीडितांच्या धार्मिक भावना दुखावल्याचा आरोपही आरोपींवर ठेवण्यात आला आहे. तसेच फिर्यादीला दिलेल्या कथित गुंगीकारक पदार्थाचा स्रोत, आर्थिक व्यवहार, बँक खात्यांतील निधी आणि संभाव्य नेटवर्क याबाबतही पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. निदा खानच्या अटकेनंतर या कथित धर्मांतरण रॅकेटचे आंतरराज्यीय किंवा आंतरराष्ट्रीय संबंध आहेत का, याचाही तपास सुरू करण्यात आला आहे. डिजिटल पुरावे, संपर्कातील व्यक्ती आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी वेगाने सुरू असून, पुढील काही दिवसांत आणखी मोठे खुलासे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४